Incharge

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154189

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. ३० , वर्ष २०२२, दिनांक २१/६/२२
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988, कलम Sections ०७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून २०/६/२२, वेळ ........, तारीख पर्यंत २०/६/२२, वेळ ........
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २०/६/२२, वेळ १२:२० वा.
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०९, तारीख २१/६/२२, वेळ ०१:२० वा.
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
   कांजुरमार्ग रेल्वे स्टेशन येथील ०५ ते ०८ तिकीट खिडकी समोरील ... जाणारे ... रेल्वे ... तिकीट ... पुढील उत्तरमार्गे कांजुरमार्ग रेल्वे स्टेशन ते विक्रोळी रेल्वे स्टेशन दरम्यान
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव – हर्ष, (b) वडिलांचे / पतीचे नाव देवेंद्रकुमार अग्रवाल
   Name Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय २० वर्षे, (d) राष्ट्रीयत्व भारतीय, फोन नं. २००१९७५०६०७९
   Date of Birth and Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........, दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय पार्किंग बिझनेस
   Passport No. Date of issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste पंजाबी, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता, गल्ली / वार्ड नं., घर / नाव नं., फोन / मो. नं., पॅन नं., कार्ड नं.
   विलास निवास, ७ वे मजले, फुलाताला कंपाउंड, ... रोड, भांडुप वेस्ट, मुंबई - ७८
   Address Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........, सध्याचा पत्ता ........
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर देणाऱ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   श्री. संतोष उध्दव जताळकर वय ४५ वर्षे धंदा - नोकरी, रा. हि रूम नं ७०२, साकळी अपार्टमेंट गोविंदराव हॉटेल जवळ, गणेश घाट, कात्रप बदलापूर (पू)

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

दि २२/८/२२

यातील फिर्यादी श्री हर्ष देवेंद्रकुमार अग्रवाल वय २० वर्षे यांचा स्वतंत्र कागदावर संगणीकृत करण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

शहाबनाज मुल्ला
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... तात्काळ .........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... लाचेची रक्कम रुपये ८०,०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) .........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

त. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे राहत असलेल्या परीसरातील एका व्यक्तीच्या अनधिकृत बांधकामामुळे पावसाळ्यात फिर्यादी यांच्या घरात पाणी भरत असते तसेच सदर इसमाने अनधिकृत नळजोडणी करून पाण्याचा वापर करत असल्याबाबत सदर इसमावर कारवाई करण्याकरीता मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयात तक्रार अर्ज केला होता. सदरचा अर्ज लोकसेवक संतोष जैताळकर, जलमापक पर्यवेक्षक, म.न.पा. कार्यालय एस वार्ड, कांजुरमार्ग पुर्व-४२ यांच्याकडे चौकशीकरीता प्रलंबित होता. सदर अर्जाचे चौकशीकरीता फि. हे वेळोवेळी लोकसेवक यांच्याकडील कार्यालयात गेले असता लोकसेवक यांनी फि. यांचे तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता रु. १,००,०००/- लाचेची मागणी करत तडजोडीअंती रु. ८०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केले. दि. २२/०६/२२ रोजी करण्यात रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना फिर्यादी यांचेकडून रु. ८०,०००/- लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांचे विरुद्ध भ्र. प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले

त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो. नि. मुल्ला .........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, .........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........., जिल्हा ........., राज्य .........

**Action taken** : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)......... Rank......... No......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to......... (3) Transferred to P. S. .........

District......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्यावी एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature] 22-6-22

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature] 22/06/22
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... शाहनवाज मुल्ला
पदनाम Rank ... पोलिस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. .........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner

दि. २२/०६/२०२२

जबाब

मी हर्ष देवेंद्रकुमार ॲब्रॉल वय ३० वर्ष, धंदा-पार्किंग बिझनेस, रा.ठी. शितल निवास, डी.के.ॲब्रोल, फूगावाला कंपाउंड, कवारी रोड, भांडूप वेस्ट, मुंबई. मो.नं. ९००४६७९७४१.

--------

मी वरील प्रमाणे असून मी जन्मापासून वरील पत्त्यावर रहाणेस आहे. घरी मी व माझी पत्नी आश्विनी असे रहाणेस आहे. आम्ही रहात असलेले फुगावाला कंपाउंड मध्ये माझे आई, वडील व वडीलांचे भाऊ त्यांचे सर्व कुंटुबासह माझे जन्मापासून रहाणेस आहे. आम्ही रहात असलेल्या फुगावाला कंपाउंड च्या दक्षिणेला पाण्याचा नाला वहातो. सदर नाल्यावर गणेशभाई छगनलाल कुमावत याने मागील ७ ते ८ वर्षापुर्वी नाल्याची रुंदी कमी करुन १+१ घर बांधलेले आहे. त्यामुळे पावसाचे दिवसात मी रहात असलेल्या फुगावाला कंपाउंड मधील सर्व घरांमध्ये पाणी भरते व त्याचा कंपाउंड मध्ये रहाणारे सर्वाना त्रास होतो आहे. त्यामुळे मी गणेशभाई कुमावत याने श्री गणेश वडापाव, दुकान नं. ९, टिळक निवास, महाराष्ट्र नगर रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई. हे अनाधिकृत बांधकाम करुन अनाधिकृत पाण्याचा वापर करीत असलेबाबत दि.११/०४/२०२२ रोजी जन माहिती अधिकारी, सहाय्यक अभियंता (जलकामे) 'एस' विभाग यांचेकडून माहिती प्राप्त करून घेतली असता. गणेशभाई कुमावत हा श्री गणेश वडापाव चे दुकानात मनपा चे पाणी चोरी करून वापरत असल्याचे माझे लक्षात आल्याने गणेशभाई कुमावत याचेवर कारवाई होणेकरीता दि.२४/०५/२०२२ रोजी मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती घेणेकरीता दि.१३/०६/२०२२ रोजी मी मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . जलखाते विभागात गेलो असता जलमापक पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (जलकामे) श्री संतोष जैताळकर यांना भेटून माझे अर्जाबाबत चौकशी केली असता त्यांनी 'हमारा कुछ करो तो, हम भी आपका कुछ करेंगे' असे बोलला. त्यावर मी त्यास ठिक आहे असे म्हणालो व घरी निघून गेलो.

दि. १७/०६/२०२२ रोजी शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता मी माझ्या वरील कामाकरीता मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . येथील कार्यालयात जावून जलमापक पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (जलकामे) श्री संतोष जैताळकर यांच्याकडे माझ्या तक्रारी अर्जावर काय कारवाई केली असे विचारले असता त्याने मला 'कैसा है की, देखो हमे वरळी ऑफिस मे भी देना पडेगा' असे बोलला. तेव्हा मी त्याला 'वरळी मे क्या है' असे विचारले असता त्याने 'वरळी मे २ साहब है उनको भी देना पडेगा' असे बोलला. तेव्हा मी त्याला कितना देना पडेगा असे विचारले. तेव्हा त्याने मला 'सब मिलाके १ लाख रुपये तो देना पडेगा' असे समक्ष बोलला. तेव्हा मी त्याला 'आप काम कैसे करेगे, गणेश को कितना फाईन होगा' असे विचारले. तेव्हा त्याने मला 'कम से कम ७ ते ८ लाख रुपये का फाईन लगेगा' असे बोलला. त्यानंतर मी त्याला माझे वडीलांना विचारुन किती पैसे देणे मला शक्य होईल ते सांगतो असे सांगुन घरी निघून आलो.

त्यानंतर त्याने मला वारंवार त्याचे मोबाईल नं.८३५६९७५७६४ व ९०७५२०८२२६ या नंबरवरुन माझे मोबईल नं.९००४६७९७४१ यावर फोन करुन संतोष जैताळकर हे मला काम लवकर करण्यासाठी १ लाख रुपये देण्यासाठी वारंवार मागणी करीत आहे.

मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . येथील श्री. संतोष जैताळकर, सहाय्यक अभियंता (जलकामे), जलमापक पर्यवेक्षक यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक २०/०६/२०२२ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ.नितीन जाधव व पो.नि. शहानवाज मुल्ला यांना भेटलो असता त्यांनी श्री. जैताळकर यांनी लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून

Scanned with CamScanner

देण्यास सांगितले. माझा मराठीत टंकलिखीत तक्रारी अर्ज सही करून दिला. पो.नि. मुल्ला यांनी सदर अर्जावर माझी सही घेतली. त्यांनतर पो.नि. मुल्ला यांनी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायातील दुसऱ्या मजल्यावरील कक्ष क्र. २०८ मध्ये घेवून गेले. सदर ठिकाणी पो.नि. मुल्ला यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. मुल्ला यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक २०/०६/२०२२ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. मुल्ला यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. मुल्ला यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि मुल्ला यांनी दिनांक २०/०६/२०२२ रोजी पंचांसमक्ष मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई येथील श्री. जैताळकर यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. मुल्ला यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून मला श्री.जैताळकर यांनी त्यांच्या मोबाईलवरून प्रवासा दरम्यान वारंवार मला फोन करून त्यांच्या कार्यालयाबाहेरील ब्रिजखाली येण्यास सांगीतल्याप्रमाणे त्याठिकाणापासून थोडे लांब कांजुरमार्ग पश्चिम, महर्षी कर्वेनगरच्या कमानीच्या पुढे रहदारीच्या रस्त्यावरील परिसरात शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. मुल्ला यांनी मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई कार्यालयाबाहेरील ब्रिजखाली श्री. जैताळकर यांचेकडे पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. गवई यांचे सह चालत पाठविले. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर माझे व लोकसेवकामध्ये माझे कामसंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक श्री. जैताळकर यांनी गणेशभाई कुमावत हे अनधिकृत बांधकाम करून अनधिकृत पाण्याचा वापर करीत असल्याने त्याच्यावर कारवाई करण्या संदर्भात केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता माझेकडे १ लाख रूपय लाचेची मागणी केली व त्यांनतर त्यांनी ती मागणी स्वत:साठी २०,०००/- रू. व कार्यालयातील इतर तीन जणांचे प्रत्येकी २०,०००/- असे एकूण येथील रू. ८०,०००/- वर तडजोड करून ती रक्कम घेऊन दि.२१/०६/२०२२ रोजी सकाळी पुन्हा फोन करून येण्यास सांगितले.

त्यानंतर मी कांजुरमार्ग पश्चिम, महर्षी कर्वेनगरच्या कमानीच्या पुढे रहदारीच्या रस्त्यावरील परिसरात उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. मुल्ला यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचांना व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . येथील श्री. जैताळकर यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व तडजोड करून रू.८०,०००/- दि. २१/०६/२०२२ रोजी फोन करून घेवुन येण्यास सांगितल्याने पो.नि. मुल्ला यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली व आम्ही वरळी कार्यालयात परत आलो. त्यानंतर पो.नि. मुल्ला यांनी मला लाचेच्या मागणीप्रमाणे मला रू. ८०,०००/- ची व्यवस्था करून दि. २१/०६/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई कार्यालयास सकाळी १०.०० वाजता येण्यास सांगितले.

मी दिनांक २१/०६/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई कार्यालयास सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास हजर झालो. त्यांनतर पो.नि. मुल्ला यांनी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील तळमजला हॉल मध्ये घेवून गेले. सदर ठिकाणी पो.नि. मुल्ला, स.पो.आ.जाधव, पंच तसेच पोलीस पथक हजर होते. पो.नि. मुल्ला यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे बचतीमधील रू. ८,०००/- (भारतीय चलनाच्या रू. २००० दराच्या ४ नोटा) पो.नि. मुल्ला यांच्या ताब्यात दिल्या. त्यानंतर पो.नि. मुल्ला यांनी नमुद नोटांचे झेरॉक्स काढले.

समक्ष

(शहानवाज मुल्ला)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

फिर्यादी हर्ष देवेंद्रकुमार अँग्रॉल यांचा दि.२२/०६/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.

पो.नि. मुल्ला यांनी आज दि. २१/०६/२०२२ रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगुन मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन घेण्यात आलेली रक्कम रू. ८,०००/- (भारतीय चलनाच्या रू. २००० दराच्या ४ नोटा तसेच रू.२००० दराच्या ३६ बनावट नोटा) नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. मुल्ला यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला चेहऱ्यावर मास्क घालून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील तळमजला हॉल मध्ये पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम माझे जवळील स्पार्क कंपनीच्या ग्रे रंगाच्या साईड बॅगेच्या बाहेरील कप्प्यात मध्ये ठेवली. त्यांनतर पो.नि. मुल्ला यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून मला श्री.जैताळकर यांनी फोन करून 'आ जाव ना कल आये थे उधर ही आजा' ... 'नही नही नही...इधर मत आव...वो जो ब्रीज था ना...कल अपुन मिले थे ना'...असे बोलला होता त्याप्रमाणे त्याठिकाणापासून थोडे लांब कांजुरमार्ग पश्चिम, महर्षी कर्वेनगरच्या कमानीच्या पुढे रहदारीच्या रस्त्यावरील परिसरात शासकीय वाहनासह थांबलो. त्यांनतर माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच क्र. ०१ श्री.गवई यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांनी बोलविलेल्या ठिकाणी जय गुरूदेव हॉटेल, कांजुरमार्ग (पुर्व) रेल्वे स्टेशन जवळ चालत पाठविले. माझे पाठोपाठ पंच क्र. ०२ मेश्राम व पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक यांने सांगीतलेल्या ठिकाणी गेलो असता लोकसेवक जैताळकर हे नमुद ठिकाणी आले नसल्याने मी व पंच वाट पहात उभे राहीलो. त्यानंतर काही वेळाने मी लोकसेवक जैताळकर यांना त्यांचे मोबाईलवर नं.८३५६९७७०६४ वर फोन करून विचारले असता त्यांनी 'ऑफीस मे... आ रहा हू... आ रहा हू'... असे सांगीतले. त्यांनतर काही वेळाने लोकसेवक जैताळकर नमुद ठिकाणी आले व मला पंचासमक्ष हाताने ईशारा करून सोबत येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी, पंच गवई व लोकसेवक जैताळकर आम्ही कांजुरमार्ग (पुर्व) रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालत निघालो. आमच्या पाठोपाठ पो.नि.मुल्ला, स.पो.आ. जाधव, पंच क्र.२ मेश्राम तसेच इतर पोलीस पथक लोकसेवकास संशय येणार नाही असे अंतर ठेवून आमच्या पाठोपाठ चालत आले. आम्ही चालत कांजुरमार्ग (पुर्व) रेल्वे स्टेशन प्लॅट फॉर्म क्रमांक २ येथे येऊन थांबलो. त्यांनतर लोकसेवक जैताळकर यांनी मला 'आप क्या करो... मेरे को ट्रेन मे देदो... अ... विक्रोली उतर जाव... मै वहॉ से आगे निकल जाऊंगा'...असे सांगितले. त्यानंतर नमुद रेल्वे स्टेशन प्लॅट फॉर्म क्रमांक २ वर सी.एस.टी. कडे जाणारी स्लो रेल्वे गाडी येऊन थांबली लोकसेवक जैताळकर यांनी मला नमुद रेल्वे मध्ये चढण्याचा ईशारा केला. त्याप्रमाणे मी, पंच व लोकसेवक जैताळकर आम्ही नमुद रेल्वे गाडीच्या सेकंड क्लासच्या डब्यात चढलो, आमच्या पाठोपाठ त्याच डब्यात इतर सर्व पोलीस पथक चढले. मी व लोकसेवक जैताळकर डब्यातील रिकामी असलेल्या सिटवर जवळजवळ बसलो व पंच क्र.१ गवई हे आमच्या समोरासमोर आमच्याकडे तोंड करून जवळच सीटवर बसले. त्यांनतर मी लोकसेवक जैताळकर यांच्याशी चर्चा करत असताना त्यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम पंचासमक्ष 'इसमे डाल दो... इसमे डालो'... असे सांगून सोबत घेऊन आलेल्या त्यांच्या पिशवीत टाकण्यास सांगीतली. सदर पिशवीत लोकसेवक जैताळकर यांच्या जेवणाचा डबा व मोबाईल फोन चार्जर होता. लोकसेवक जैताळकर यांनी लाचेची रक्कम नमुद पिशवीत टाकून पुढील येणाऱ्या विक्रोळी रेल्वे स्थानकावर उतरण्यास सांगीतल्याप्रमाणे मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ८०,०००/- (रू. २००० दराच्या ४ भारतीय चलनी नोटा तसेच रू. २००० दराच्या ३६ बनावट नोटा) लोकसेवक यांच्या डब्याच्या पिशवीत टाकली. लोकसेवक जैताळकर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी 'आ गया विक्रोली'...असे बोलून सीटवरुन उठून सापळा पथकास

Scanned with CamScanner

दिसेल अशारीतीने माझा चेहऱ्यावर मार्स्क लावून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर पो.नि. मुल्ला व स.पो.आ.जाधव व पोलीस पथक यांनी लोकसेवक जैताळकर यांना आपली ओळख सांगून ताब्यात घेतले व लगेचच आलेले विक्रोळी रेल्वे स्थानकावर मी, दोन्ही पंच तसेच सर्व पोलीस पथक व लोकसेवक जैताळकर यांना ताब्यात घेऊन उतरलो. त्यानंतर पो.नि.मुल्ला यांनी मला सापळा कारवाई दरम्यान माझे शर्टाचे आतील बाजुस असलेला बनियानला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला व स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. मुल्ला व स.पो.आ.जाधव व पोलीस पथक तसेच पंचांसोबत लोकसेवक जैताळकर यांना विक्रोळी (पश्चिम) रेल्वे स्थकाच्या बाहेरील बाजूस घेऊन आलो. त्यानंतर पो.नि. मुल्ला यांनी दोन्ही शासकीय वाहनावरील चालकांना विक्रोळी ( पश्चिम) रेल्वे स्थानकाबाहेर शासकीय वाहन घेऊन येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर स.पो.आ .जाधव यांनी श्री. जैताळकर यांच्या कार्यालयातील वरिष्ठांना मोबाईलव्दारे झालेल्या कारवांईबाबत कळवून पुढील कार्यवाहीकरीता पोलीस पथक व लोकसेवक व शासकीय पंच असे लाप्रवि कार्यालय वरळी येथे जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व लोकसेवक जैताळकर असे आम्ही सर्व दोन शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . येथील जलमापक पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (जलकामे) श्री संतोष जैताळकर यांनी मी गणेशभाई कुमावत याने श्री गणेश वडापाव, दुकान नं. ९, टिळक निवास, महाराष्ट्र नगर रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई . हे अनाधिकृत बांधकाम करुन अनाधिकृत पाण्याचा वापर करीत असलेबाबत मी माहितीच्या अधिकाराने खात्री करुन गणेश कुमावत याचेवर कारवाई होणेकरीता दि. २४/०५/२०२२ रोजी मा. आयुक्त ब्रुहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती घेणेकरीता दि.१३/०६/२०२२ रोजी मी मुंबई महानगरपालिकेच्या जलखाते विभागात गेलो असता श्री संतोष जैताळकर यांनी त्यांच्याकडील प्रलबित असलेला तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता माझेकडे दि. २०/०६/२०२२ रोजी १ लाख रूपये लाचेची मागणी केली व पडताळणीवेळी तडजोडीअंती रू ८०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व दि. २१/०६/२०२२ रोजी लोकसेवक जैताळकर यांनी ८०,०००/- रूपये रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री.संतोष जैताळकर यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

मुंबई महानगरपालिका, जलकामे विभाग, एस वार्ड, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई . येथील जलमापक पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (जलकामे) श्री संतोष जैताळकर यांचेशी माझे कोणतेही पूर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( शहानवाज मुल्ला ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner